


दैनिक निडर निर्भिड
# जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!




संपादक : जितेंद्र कायस्थ    Mob- 9822720784    Email- jansanchlan@gmail.com    RNI NO-MAHMAR/2022/90217

वर्ष ३ रे    अंक : ३९४ वा    शुक्रवार    दि १९ जून २०२६    पृष्ठ ८    किमंत ३ रुपये

# तत्कालीन भ्रष्ट मंडळ अधिकारी तथा नायब तहसीलदार विजय टेकाळेंवर कारवाई ३ वर्षांपासून गुलदस्तात?

## तुकडेबंदीचे उल्लंघन करून ५२ अनोंदणीकृत फेरफार मंजूर!

### एसीबी विभागाची खुली चौकशी सुरु असतांना ही पदोन्नती कशी?

**जनसंचलन-बुलढाणा**

**आस्थापणाला टेकाळे यांनी केलेल्या नियमबाह्य कामांचा तक्रारींचा व एसीबी चौकशी सुरू असतांना पदोन्नतीसाठी सकारात्मक अहवाल कसा दिला याची महसूल विभागातील वरिष्ठाणी त्वरित चौकशी करून सत्य ते काय तपासून विजय टेकाळे यांच्यावर व त्यांना नियमबाह्य कामात मदत करणाऱ्यांवर फोजदारी स्वरूपाचे गुन्हे दाखल करावे अन्यथा तक्रारकर्ते पुढील आठवड्यात दिनांक २४ जून २०२६ ला जिल्हाधिकारी कार्यालयासमोर महसूल विभागातील भ्रष्टाचार विरोधात उपोषण करणार**




सातगाव म्हसला येथे कार्यरत असताना मंडळ अधिकारी विजय दत्तात्रय टेकाळे यांनी तुकडेबंदीचे उल्लंघन करून बेकायदेशीर अनोंदणीकृत वाटणीपत्रांवर तब्बल ५२ फ `रफार मंजूर केल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे.या प्रकरणात शासनाचा मोठ्या प्रमाणात महसूल बुडाल्याचा दावा करत तक्रारकर्त्यांनी महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे विभागीय आयुक्त अमरावती,जिल्हाधिकारी बुलडाणा,यांच्याकडे निवेदन सादर करून टेकाळे यांना सेवेतून बडतर्फ करण्याची मागणी केली आहे. तक्रारकर्त्यांच्या म्हणण्यानुसार, टेकाळे यांनी म्हसला बु. येथे कार्यरत असताना चांडोळ भाग एक व दोन येथील तलाठ्यांकडून नियम धाब्यावर बसवून अनोंदणीकृत वाटणीपत्रांच्या आधारे फेरफार मंजूर केले.तुकडेबंदी कायद्याचे सरळसरळ उल्लंघन करून ही प्रक्रिया राबवण्यात आल्याने महसूल प्रशासनाच्या कामकाजावर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. या प्रकरणी तत्कालीन जिल्हाधिकाऱ्यांकडे वारंवार तक्रारी करूनही अद्याप ठोस चौकशी किंवा कारवाई झालेली नसल्याचा आरोप तक्रारकर्त्यांनी केला आहे. सर्व पुरावे उपलब्ध करून दिल्यानंतरही संबंधित यंत्रणा या अधिकाऱ्याला का वाचवत आहे, असा सवाल उपस्थित होत आहे. शासनाचा गलेलठ्ठ पगार घेऊनही नियमबाह्य कामे करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई होत नसेल, तर सामान्य नागरिकांचा प्रशासनावर विश्वास कसा राहणार, असा संतप्त सवालही उपस्थित केला जात आहे. तक्रारकर्त्यांनी केंद्रीय मंत्री,महसूल मंत्री,आयुक्त,एसीबी अमरावती, एसीबी बुलढाणा आणि जिल्हाधिकारी कार्यालयाकडे पुरावे सादर केल्याचा दावा केला आहे. टेकाळे यांच्या स्वतः च्या तसेच कुटुंबीयांच्या नावे मोठ्या प्रमाणात करोडो रुपयांची चल-अचल संपत्ती असल्याचा आरोपही निवेदनात करण्यात आला आहे. आता महसूल मंत्री व महसूल विभाग वरिष्ठ अधिकारी या प्रकरणात त्वरित चौकशीचे आदेश देणार का? आणि नियमबाह्य केलेल्या कामात भ्रष्टाचारातून कमावलेली चल अचल संपत्ती दिलेल्या पुराव्यानुसार आढळल्यास विजय टेकाळेंना सेवेतून बडतर्फ केले जाणार का? याकडे जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

# एल निनोच्या पार्श्वभूमीवर पाणीटंचाई व पीक पेरणीचे नियोजन करा- प्रविणकुमार देवरे

**जनसंचलन/बुलढाणा**

एल निनोच्या प्रभावामुळे यंदा मान्सूनचा पाऊस विलंबाने येण्याची शक्यता हवामान खात्याने वर्तवली आहे. या पार्श्वभूमीवर कृषी आणि महसूल प्रशासनाने सतर्क राहून संभाव्य पाणीटंचाईचे योग्य नियोजन करावे. तसेच दुबार पेरणीचे संकट टाळण्यासाठी शेतकऱ्यांनी घाईगडबडीने पिकांची पेरणी करू नये, यासाठी गाव पातळीवर व्यापक जनजागृती मोहीम राबविण्याचे निर्देश जिल्हाधिकारी डॉ. प्रविणकुमार देवरे यांनी दिले. जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित विविध महत्त्वाच्या विषयांच्या व्यापक आढावा बैठकीत जिल्हाधिकारी बोलत होते. या बैठकीला अपर जिल्हाधिकारी सुधीर खांदे, निवासी उपजिल्हाधिकारी सुरेश कव्हडे, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी संतोष डाबरे, पशुसंवर्धन उपायुक्त डॉ. अमितकुमार दुबे, जिल्हा अग्रणी बँकेचे व्यवस्थापक कौशलेंद्रकुमार सिंग यांच्यासह विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. या बैठकीत प्रामुख्याने संभाव्य पाणीटंचाईची पूर्वतयारी, लांबणीवर पडलेला पाऊस, खरिपाची पेरणी, बियाण्यांचे नियोजन, नैसर्गिक आपत्ती, शेतकऱ्यांना कर्जपुरवठा आणि शेतकरी कर्जमाफी योजनेची प्रभावी अंमलबजावणी यावर सविस्तर चर्चा करून नियोजन करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी यांनी दिले. जिल्हाधिकाऱ्यांनी स्पष्ट केले की, जोपर्यंत जमिनीत किमान ५ ते ६ इंच पावसाचे पाणी मुरत नाही (योग्य ओल निर्माण होत नाही), तोपर्यंत शेतकऱ्यांनी कोणत्याही परिस्थितीत घाईगडबडीत पेरणी करू नये. बियाणे वाया जाण्यापासून आणि दुबार पेरणीच्या आर्थिक संकटातून शेतकऱ्यांचे रक्षण करण्यासाठी ही खबरदारी घेणे अत्यंत आवश्यक आहे. याविषयी महसूल व कृषी विभागाने गाव पातळीवर जनजागृती करावी, तसेच जिल्ह्यात खरीप हंगामासाठी दर्जेदार बि-बियाणांची कमतरता भासू नये म्हणून चोख नियोजन ठेवावे, असेही त्यांनी सांगितले. खरीप हंगामासाठी पात्र असणाऱ्या प्रत्येक शेतकऱ्याला विनाविलंब व सन्मानपूर्वक कर्जपुरवठा होईल याची पूर्ण दक्षता घेण्याच्या सूचना जिल्हाधिकाऱ्यांनी अग्रणी बँकेच्या व्यवस्थापकांना दिल्या. शेतकऱ्यांना बँकांमध्ये हेलपाटे मारावे लागू नयेत आणि कर्ज प्रक्रियेत कोणतीही तांत्रिक अडचण येऊ नये, यासाठी जिल्ह्यातील प्रत्येक बँक शाखेत स्वतंत्र कृषी मदत केंद्र सुरू करण्याचे स्पष्ट निर्देश त्यांनी दिले.

आगामी काळातील संभाव्य टंचाई लक्षात घेता सर्व तालुक्यांमध्ये पूर्वतयारी व आवश्यक उपाययोजनांचा कृती आराखडा तात्काळ राबवावा. जिल्ह्यातील नागरिकांना टंचाईच्या काळात सुरळीत पाणीपुरवठा होईल याचे चोख नियोजन करून आवश्यकतेनुसार तात्काळ टँकर उपलब्ध करून द्यावेत. यासोबतच जिल्ह्यातील जलसंधारणाची कामे तातडीने हाती घेण्यात यावीत आणि पशुधनाला चारा टंचाई भासू नये म्हणून आत्तापासूनच आवश्यक चाऱ्याचे काटेकोर नियोजन करावे, असेही जिल्हाधिकाऱ्यांनी निर्देश दिले.

# देवा तुझे किती सुंदर स्वराकाश!



संगीतकार वसंत देसाई यांच्याकडे चित्रपट, बालगीतं अशा गायनाची खऱ्या अर्थाने माझी सुरुवात झाली असं म्हणता येईल. आम्ही सगळे गाणारे त्यांच्या घराला संगीत-मठ म्हणायचो. वसंत देसाईंकडे मी बालगीतं गायले! साधना घाणेकर (साधना सरगम) त्यावेळी छोटी होती. तिला कडेवर घेऊन मला रेकॉर्डिंग करायचं होतं. तिला कडेवर घेऊन मी गायला उभी राहिले. आधी ती मला म्हणते, ङआई, मला ते बाहुलीचं गाणं ऐकवं ना गंफ. मी म्हणते, ङऐकवते हंफ आणि मग गाणं गाते, त्यावेळी मधुकरराव चौधरी हे राज्याचे शिक्षणमंत्री होते. मुलांना कविता पाठ व्हायला हव्या असतील तर त्यांना त्या चालीवर म्हणायला लावा, अशी त्यांची भूमिका होती. म्हणून त्यांनी ङस्टेट म्युझिक डायरेक्टरफ असं पद सरकारात निर्माण केलं. वसंत देसाई होते महाराष्ट्राचे स्टेट म्युझिक डायरेक्टर. इथं मला आवर्जून उल्लेख करायचाय तो म्हणजे त्या पदाला चौधरींनी मानधन देऊ केलं होतं. पण वसंत देसाईंचं मोठेपण इतकं की त्यांनी ते नाकारलं. मात्र ते म्हणाले, ङमाझ्याकडे बालगीतांसाठी काही मुलं गातात, तसंच फैय्याजताई गातात, घांग्रेकर गातात, नीला रवींद्र आहेत, या सर्वांना दरमहिना मानधन द्याफ. आमचं रेकॉर्डिंग एचएमव्हीच्या स्टुडिओमध्ये व्हायचं. देसाईंकडे मी माझ्या शालेय वयातली कवी ग. ह. पाटील यांची कविताही गायले, वसंत देसाईंनी संगीत दिलेल्या चित्रपटांपैकी काही चित्रपटांत मी गायले. विकास देसाई यांच्या चित्रपटांसाठी गायले. ङशकफ चित्रपटात शबाना आझमी आणि विनोद खन्ना यांच्यावर चित्रित झालेलं आणि गुलजार यांनी लिहिलेलं ते गीत, ङअचानकफ या चित्रपटासाठीही मी गायले. वसंत देसाईंमुळे मला खूप शिकायला मिळालं. वसंत देसाईंनी आम्हा सर्वांना सर्वकडे नेलं. अर्थात, प्रत्येक कार्यक्रमाच्या वेळी माझ्यासाठी पणशीकरांनी तारखा अडजस्ट केल्या कायम. कट्यार काळजात घुसलीफ नाटक पाहून गदिमांच्या ङगीतगोपालफ या संगीत कार्यक्रमासाठी मला आणि बकुल पंडित आम्हाला सी. रामचंद्र (अण्णा) यांनी बोलावलं. ङगीतगोपालफसाठी वसंत ठेंगडी यांची मुलगी निवेदन करायची. पहिलंच गाणं माझं होतं, आमच्या तालमी पुण्याला अण्णांच्या घरी ङसरगममला चालायच्या. ङपंचवटीफ या बंगल्यात गदिमा राहायचे. ङगीतगोपालफचा पहिला कार्यक्रम पुण्यात ङबालगंधर्वफला झाला. त्यात मी, बकुळ पंडित, प्रमिला दातार, प्रभाकर कारेकर, राणी वर्मा, प्रकाश घांग्रेकर असे होतो. मग सी. रामचंद्रांनी घरकुल चित्रपट केला. त्यामध्ये ङकोन्यात झोपली सतारफ (जे गीत ङजोगियाफ म्हणून प्रसिद्ध आहे.) हे गाणं म्हणण्यासाठी मला घेतलं. गणिकेचं दुःख मांडायचं होतं. गदिमांचं अप्रतिम काव्य आहे ते गणिकेची अगतिकता, तिच्याकडे अनेक माणसं येतात आणि एकावर तिचा जीव जडतो पण शेवटी मी गणिका, हे सत्य तिच्यापुढे उभं राहतं. ते नाकारताना, तिला हवं ते प्रेम स्वीकारण्याची धडपड हे सगळं गदिमांनी शब्दांतून अक्षरशः चितारलंय. ते गाणं म्हणताना मला आजही भरून येतं. या गाण्याची हकिकत अशी, की मी त्यावेळी बेगम अख्तर बाईंच्या रेकॉर्डिंगच्या वेळी, कार्यक्रमांना मागे तानपुरा साथ करत असे. **एकदा बाईंचं एचएमव्हीतलं रेकॉर्डिंग संपवून मी पहाटे** घरी आले होते. तेव्हा मी माहिमला छोट्याशा घरात राहायचे. माझ्याबरोबर माझी आजी होती. येऊन मी नुकती झोपले होते. दिवस जुलैचे, मुंबईच्या प्रचंड पावसाचे होते. तेवढ्यात पहाटे साडेपाचच्या सुमारास आजीने मला उठवलं, ङगाडी घेऊन कुणीतरी उंचपुरा माणूस आलाय बघ.फ काहीशा नाराजीनेच मी उठले. समोर पाहते तर अण्णा (सी. रामचंद्र). मला म्हणाले, ङतुला सकाळी साडेदहा पर्यंत बॉम्बे लॅबला यायचंय, एक गाणं गायचंयफ. मी म्हणाले, ङअण्णा माझी काहीच तालीम नाही, मी काय गाणारफ. त्यांनी काही ऐकलं नाही. मी बॉम्बे लॅबला गेले. त्यांनी ते ङजोगियाफ काव्य हातात दिलं. जवळजवळ १७ कडव्यांचं ते भलंमोठं काव्य पाहून मी आश्चर्य व्यक्त केलं. मी म्हणाले, ङअण्णा, अहो इतकं मोठं काव्य कधी आणि कशी करणार मी ताबडतोबफ. ते म्हणाले, ङहे पहा आपण एकेक कडवं करू याफ. अण्णांनी माझ्याकडून असं एकेक कडवं करत ङजोगियाफ गाऊन घेतलं. दुपारी ३ नंतर एकदाचं रेकॉर्डिंग संपलं. ते गाणं राष्ट्रीय पुरस्कारासाठी नामनिर्देशन मिळालं. पण या पुरस्काराने मला हुलकावणी दिली.




*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

# 'ठाकरे गट काँग्रेसमध्ये विलीन होण्याचा विचार करत होता?', बंडखोर खासदारांनी काय सांगितलं?

**दिल्ली/वृत्तसंस्था**

शिवसेनेत दुसऱ्यांदा बंड झालं आहे आणि सहा खासदार फुटले आहेत हे आता सगळ्या देशाला समजलं आहे. दरम्यान या खासदारांची भूमिका समोर आलेली नाही. अशात आता उद्धव ठाकरेंबाबत एक माहिती खासदारांनी ओम बिर्लांना लिहिलेल्या पत्रात नमूद केल्याची सूत्रांची माहिती आहे. यावेळी जी फूट पडली आहे ती मागील चार वर्षात पडलेली दुसरी फूट आहे. आज झालेल्या शिवसेनेच्या बैठकीलाही सहा खासदार अनुपस्थित होते. त्यानंतर आता ओम बिर्ला यांना खासदारांनी जी तक्रार केली त्याबाबतची माहिती समोर आली आहे.

उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेचे एकूण ९ खासदार आहेत, त्यापैकी ६ खासदार हे एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेत सहभागी होतील हे जवळपास निश्चित मानलं जातं आहे. या



खासदारांनी ओम बिर्ला यांची भेट घेतली आणि त्यांना हे सांगितलं की २०२२ पूर्वीची शिवसेना होती ती आपल्या मूळ विचारांपासून बाजूला गेली आहे. त्यामुळे आम्हाला स्वतंत्र गट म्हणून मान्यता द्यावी. एवढंच नाही या खासदारांनी असा दावा केला आहे की ठाकरे गटातील वरिष्ठ नेत्यांनी असा निर्णय घेतला होता की भविष्यात काँग्रेसमध्ये विलीन होण्याचा निर्णय घेतला होता. ही योजना समजल्यानेच आम्ही पक्ष सोडण्याचा निर्णय घेतला असं या खासदारांनी ओम बिर्लांना सांगितल्याची सूत्रांची माहिती आहे. या खासदारांचा रोख उद्धव ठाकरे यांच्याकडेच होता पण त्यांनी त्यांचं थेट नाव घेतलेलं नाही. तसंच याबाबत अधिकृत विधान समोर आलेलं नाही.

उद्धव ठाकरेंचा पक्ष दुसऱ्यांदा फुटला असून हा सगळा घटनाक्रम २०२२ मध्ये एकनाथ शिंदे यांनी जे बंड पुकारलं होतं अगदी तसाच आहे. एकनाथ शिंदे हे २१ जूनला विधान परिषद निवडणूक पार पडल्यानंतर सुरतला गेले होते, त्यानंतर गुवाहाटीला गेले होते. त्यांना ४० आमदारांची साथ लाभली होती. ज्यानंतर काँग्रेस आणि राष्ट्रवादीच्या पाठिंब्यावर मुख्यमंत्री झालेल्या उद्धव ठाकरेंनी राजीनामा दिला आणि ते सरकार कोसळलं होतं. पुढे भाजपाच्या पाठिंब्यावर अडीच वर्षे मुख्यमंत्री म्हणून एकनाथ शिंदे यांनी त्यांची कारकीर्द पार पाडली. एकनाथ शिंदे यांनीही उद्धव ठाकरे मूळ विचारांपासून दूर गेले असा आरोप केला होता. तसंच आमदारांना ते भेटत नाहीत, त्यांच्या समस्या जाणून घेत नाहीत, ऐकून घेत नाहीत असेही विविध आरोप केले होते.आता सूत्रांच्या हवाल्याने ज्या बातम्या समोर येत आहेत त्यातही खासदारांनी ओम बिर्ला यांना दिलेल्या पत्रात नाराजीचा सूर आळवल्याचं समजतं आहे.

६ बंडखोर खासदार नेमकं कुठे आहेत? याबाबत अनेक सवाल उपस्थित केले जात आहे. आता याबाबतच शिवसेना (ठाकरे) खासदार संजय राऊत यांनी मोठा दावा केला आहे. या ६ बंडखोर खासदारांना दिल्लीमधून काल रात्री राजस्थानमधील एका ठिकाणी हलविण्यात आल्याचा दावा संजय राऊत यांनी आज (१८ जून) माध्यमांशी बोलताना केला आहे. तुम्ही ज्याला फूट म्हणता, त्याला आम्ही फूट म्हणत नाही, तर त्याला आम्ही गद्दारी आणि बेईमानी म्हणतो. हे सगळे लोक पैशाने विकत गेलेले आहेत.

## खा.संजय जाधव यांची सोनपेठला प्रतिकात्मक अंत्ययात्रा ; निषेधाच्या घोषणा देत शिवसैनिक रस्त्यावर

**परभणी/वृत्तसंस्था**

खासदार संजय जाधव यांच्या उबाठा शिवसेनेशी पक्षद्रोह करण्याच्या भूमिकेचे जिल्ह्यात पडसाद उमटायला प्रारंभ झाला आहे. खासदार संजय जाधव यांच्या बंडखोरीनंतर निष्ठावान शिवसैनिकांनी संताप व्यक्त केला आहे. सोनपेठमध्ये शिवसैनिकांनी आक्रमक होत खासदार संजय जाधव यांच्याविरोधात तीव्र जोडेमार आंदोलन केले आहे. संतप्त कार्यकर्त्यांनी खासदार जाधव यांची प्रतिकात्मक अंत्ययात्राही काढली. दरम्यान खासदार जाधव यांच्या निवासस्थानाबाहेर मोठा पोलीस बंदोबस्त लावण्यात आला आहे.

जिल्ह्याच्या राजकारणात 'बंडू बॉस' या नावाने परिचित असलेल्या खासदार जाधव यांनी दोन दिवसांपूर्वी तातडीने दिल्ली गाठली. त्यानंतर ते उबाठा शिवसेनेतून एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत दाखल होत असल्याच्या बातम्या प्रचंड वेगाने पसरल्या.सोनपेठ येथील शिवसेना उद्धव ठाकरे गटाच्या कार्यालयाबाहेर आज सकाळपासूनच शिवसैनिक गोळा होत असल्याचे दिसून आले. संतप्त कार्यकर्त्यांनी थेट खासदार संजय जाधव यांच्या छायाचित्राला चपलांचा हार घातला. तेथूनच त्यांची प्रतीकात्मक अंत्ययात्रा काढण्यात आली. 'गद्दार संजय जाधव' अशा घोषणा देत कार्यकर्त्यांनी हा मोर्चा शहराच्या मुख्य भागात आणला. शहरातील प्रमुख मार्गाने ही प्रतिकात्मक अंत्ययात्रा छत्रपती शिवाजी महाराज चौकात पोहोचली. या ठिकाणी कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत खासदार संजय जाधव यांच्या प्रतिमेचे जाहीर दहन



करण्यात आले. यावेळी संपूर्ण परिसर शिवसैनिकांच्या घोषणांनी दणाणून गेला. खासदार संजय जाधव यांच्या बंडखोरीमुळे परभणी जिल्ह्यातील निष्ठावान शिवसैनिकांमध्ये तीव्र असंतोष पसरला असून, आम्ही फक्त आणि फक्त उद्धव ठाकरेंसोबतच आहोत, अशी प्रतिक्रिया यावेळी कार्यकर्त्यांनी व्यक्त केली. हे आंदोलन शिवसेनेचे विधानसभा प्रमुख तथा माजी आमदार कल्याणराव रेंगे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. या आंदोलनाला शिवसेना उपजिल्हाप्रमुख कृष्णा पिंगळे, तालुका प्रमुख संतोष गवळी, शहरप्रमुख अमोल दहीवाळ, श्रीकृष्ण साठे, रामेश्वर पांडूळे, बागुल शेख, संजय जाधव, गणेश जोशी, भास्कर भोसले, वैभव यादव, तुकाराम साठे, सिध्देश्वर आव्हाड, गणेश यादव, तेजस भोसले, इम्रान सय्यद, ज्ञानेश्वर परसे, वैभव सुरवसे, गोपाळ भोसले, फेरोज पठाण, महेश भोसले, विनोद यादव, माऊली शिंदे आदी शिवसैनिक नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## 'ऑपरेशन टायगर' आताच का केलं?

**सोलापूर/वृत्तसंस्था**

यापूर्वी २०२२ मध्ये झालेल्या बंडामुळे शिवसेना दुभंगली होती आणि त्यामुळं महाविकास आघाडी सरकार कोसळलं होतं. आता मात्र, शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षातील नऊपैकी सहा खासदार जर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत सामील झाले, तर या संभाव्य बंडाचा परिणाम केवळ उद्धव ठाकरे यांच्यापुरता मर्यादित राहणार नाही, तर राज्यातील सत्ताधारी महायुतीतील राजकीय समीकरणांवरही त्याचा परिणाम होऊ शकतो.

महायुतीतील शक्ति-संतुलनात लक्षणीय बदल होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. राजकीय जाणकारांच्या मते, या संभाव्य बंडाची वेळ अत्यंत महत्त्वाची आहे. २०२२ मधील फुटीनंतर तब्बल दोन वर्षे शिंदे गटाने ठाकरे गटात एवढी मोठी फूट पाडण्याचा प्रयत्न केला नव्हता. मात्र, विधानसभा निवडणुकीनंतर महायुतीतील ताकदीचे संतुलन भाजपच्या बाजूने झुकल्याचे चित्र निर्माण झाले. त्यामुळे स्वतःचे राजकीय महत्त्व आणि पक्षाची ताकद वाढवणे शिंदे गटासाठी आवश्यक बनले. शिंदे गटातील काही नेते सध्या सुरू असलेल्या या मोहिमेला 'ऑपरेशन टायगर' असे संबोधत आहेत. त्यांच्या मते, केवळ आमदार नव्हे तर खासदारांचे संख्याबळही राष्ट्रीय राजकारणात महत्त्वाची भूमिका बजावू शकतं. त्यामुळे लोकसभेतील संख्या वाढवण्यावर भर दिला जात आहे. सध्या केंद्रातील एनडीएकडे २९३ खासदार असून भाजपकडे २४० जागा आहेत. शिंदे गटाचे संख्याबळ वाढल्यास दिल्लीतील त्यांच्या राजकीय वजनातही वाढ होऊ शकते. विधानसभा निवडणुकीनंतर महाराष्ट्राच्या राजकारणात एकनाथ शिंदे यांचे महत्त्व कमी झाल्याची चर्चा होती. मात्र, लोकसभेतील संभाव्य वाढत्या संख्याबळामुळे त्यांनी अद्यापही स्वतःचे राजकीय महत्त्व कायम असल्याचे दाखवून दिल्याचे त्यांच्या समर्थकांचे मत आहे. शिंदे गटातील एका वरिष्ठ नेत्याच्या मते, "लोकांनी शिंदेंचे राजकीय महत्त्व कमी झाल्याचे मानायला सुरुवात केली होती. मात्र, त्यांनी पुन्हा एकदा योग्य वेळी राजकीय खेळी करून आपली ताकद दाखवून दिली आहे."

## "ठाकरेंच्या शिवसेनेत फक्त तिघेच राहणार", रामदास कदमांनी ठाकरेंना डिवचलं

**मुंबई/वृत्तसंस्था**

उद्धव ठाकरे यांची शिवसेना पुन्हा एकदा फुटीच्या उंबरठ्यावर आहे. सध्या 'ऑपरेशन टायगर'ची मोठी चर्चा सुरू असून ठाकरे सेनेचे ६ खासदार फुटल्याची चर्चा आहे. याबाबत दिल्लीत मोठ्या राजकीय हालचाली सुरू आहेत. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेकडून 'ऑपरेशन टायगर' राबवण्यात येत असल्याचं बोललं जात आहे. शिवसेना (ठाकरे) पक्षाकडून या सर्व खासदारांसाठी व्हिप जारी करण्यात आला होता, पण तरीही हे ६ खासदार बैठकीला अनुपस्थित राहिले आहेत. त्यामुळे आता हे ६ खासदार फुटल्याचं मानलं जात आहे.

'ऑपरेशन टायगर'वरून सध्या आरोप-प्रत्यारोपाने राजकारण चांगलंच तापलं आहे. याच पार्श्वभूमीवर बोलताना शिवसेना (शिंदे) पक्षाचे नेते रामदास कदम यांनी प्रतिक्रिया देत उद्धव ठाकरे यांच्यावर जोरदार हल्लाबोल केला आहे. तसेच 'ऑपरेशन टायगर'वरून रामदास कदम यांनी एकनाथ शिंदे यांचं कौतुक केलं आहे. तर ठाकरेंच्या शिवसेनेत फक्त तिघेजणच राहणार असल्याची टीका करत रामदास कदमांनी उद्धव ठाकरेंना डिवचलं आहे.



"संजय राऊत काय बोलत आहेत? ही भाषा त्यांना शोभते का? संजय राऊतांनी एका पत्रकार परिषदेत बोलताना शिवीगाळ केली. महाराष्ट्र त्यांना पाहतोय. पण शिवसेना ठाकरे गटावर ही वेळ का आली? उद्धव ठाकरे यांना सोडून आमदार, खासदार, मंत्री, पक्षाचे नेते, जिल्हा प्रमुख का सोडून जात आहेत? हे सगळं कोणामुळे होत आहे? उद्धव ठाकरेंना माझं सांगणं आहे, मराठी माणसांची शिवसेना संपत आहे, शिवसेना तुमच्या एकट्याची नव्हती", अशी टीका रामदास कदम यांनी केली आहे.

"मी उद्धव ठाकरे यांना हेच सांगेल की तुम्ही पुन्हा एकदा आत्मपरीक्षण करा. तुमच्यावर ही वेळ का आली? तुम्हाला सोडून आमदार, खासदार, मंत्री, पक्षाचे नेते, जिल्हा प्रमुख का जात आहेत? तुम्ही बाळासाहेब ठाकरे यांचे पुत्र आहात, मग तुमच्या आजूबाजूला असं काय आहे की ज्यामुळे राजकारणात तुमची नाचक्की होत आहे. सध्या संपूर्ण महाराष्ट्राला जो हदरा बसला, याचं उद्धव ठाकरेंनी आत्मपरीक्षण करावं. अन्यथा प्रत्येकाला तुम्ही हेच सांगणार आहात का? की गेट आऊट, चालते व्हा. मला काही फरक पडणार नाही. बाळासाहेब ठाकरे यांनी जे उभा केलं होतं, ते सर्व कोसळताना आता महाराष्ट्र पाहात आहे. मात्र, अजूनही उद्धव ठाकरे यांच्यात परिवर्तन का होत नाही?", असा सवाल रामदास कदम यांनी केला.

"आता देखील संजय राऊत सांगत आहेत की, त्या खासदारांनी १५ कोटी घेतले, ५० कोटी घेणार आहेत. पैसे मोजायला कोण गेलं होतं? संजय राऊत गेले होते का? हे सहा खासदार आता का सोडून चाललेत, मंत्री पदावर असलेले १० जण तुम्हाला का सोडून गेले? ही साधी गोष्ट नाही. आता तुम्ही कुठे-कुठे ठिगळ लावणार आहात? तुमच्या पक्षात आता कोणीही थांबणार नाही. फक्त उद्धवजी, वहिनी आणि आदित्य ठाकरे हे तिघेच ठाकरेंच्या सेनेत राहतील", असं म्हणत रामदास कदम यांनी टीका केली.

# “कारवर पेट्रोल ओतून जिवंत जाळले”; छत्तीसगडमध्ये भाजपा नेत्याची क्रूर हत्या

**कोरिया/वृत्तसंस्था**

छत्तीसगडमधून एक धक्कादायक घटना समोर आली आहे. मंगळवारी (१६ जून)) कोरिया जिल्ह्यात रेती उपशाच्या जुन्या वादातून भाजपा नेत्यासह तिघांची अत्यंत क्रूरपणे हत्या करण्यात आली. फॉर्च्युनर कारला ट्रकच्या साहाय्याने कोंडीत पकडून, त्यावर पेट्रोल ओतून पेटवून देण्यात आली. या आगीत भाजपा नेते आणि माजी जनपद पंचायत अध्यक्ष भारत सिंह (उर्फ लल्ला सिंह) यांच्यासह तिघांचा मृत्यू झाला आहे. याप्रकरणी नऊ जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून, चार आरोपींना अटक करण्यात आली आहे. तर, फरार आरोपींचा शोध घेतला जात आहे.



मृत भारत सिंह यांच्या कुटुंबीयांनी रेती उपशाच्या जुन्या वादातून ही घटना घडल्याचा आरोप केला. भारत सिंह तडजोड करण्यासाठी गेले होते, मात्र आधीच सापळा रचण्यात आला होता, असाही आरोप कुटुंबीयांनी केला आहे. पोलिसांनी या प्रकरणात आतापर्यंत अक्षत त्रिपाठी, विशाल त्रिपाठी, सत्यप्रकाश त्रिपाठी आणि मन्नू त्रिपाठी यांना अटक केली आहे. तर, इतरांचा शोध सुरु आहे. दरम्यान, या घटनेमुळे कोरिया जिल्ह्यात तणावाचे वातावरण असून, मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. समोर आलेल्या माहितीनुसार, मृत भारत सिंह यांना रेती उपशाचे कंत्राट मिळाले होते. पण, यानंतर सोनहत, कैलासपूर, तेलीमुडा, बेलिया आणि छिंगुरा परिसरात रेती वाहतूक आणि अवैध वसुलीवरून वाद सुरू झाला.

भारत सिंह यांचा गट आणि भाजपा नेते मनोज त्रिपाठी यांचे कुटुंब यांच्यात गेल्या काही महिन्यांपासून हा वाद धुमसत होता. पैशांचे व्यवहार आणि रेतीच्या वर्चस्वावरून दोन्ही गटांतील वाद वाढला आणि त्याचे रूपांतर संघर्षात झाले. मंगळवारी भारत सिंह आणि त्यांच्या सहकाऱ्यांची कार घेरण्यात आली आणि कारवर पेट्रोल टाकून जाळण्यात आले.

### तिघांचा मृत्यू, एक जखमी

या आगीत भारत सिंह यांचा गाडीतच होरपळून मृत्यू झाला. तर, वीरेंद्र सिंह यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला आणि भारत यांचे चुलत भाऊ नागेंद्र सिंह यांचाही मृत्यू झाला. या आगीत मयांक सिंह हे गंभीर जखमी झाले असून, त्यांच्या डोक्याला आणि चेहऱ्याला गंभीर दुखापत झाली आहे. त्यांच्यावर बिलासपूरच्या अपोलो रुग्णालयात उपचार सुरू आहेत. मृत भारत सिंह हे पूर्वी काँग्रेसमध्ये होते, परंतु भूपेश बघेल सरकारच्या काळात त्यांनी भाजपमध्ये प्रवेश केला होता. दरम्यान, सिंह यांच्या कुटुंबाने या संपूर्ण प्रकरणाची सीबीआय चौकशी करण्याची मागणी केली आहे. रेती खदाणीच्या जुन्या वादातून ही घटना घडल्याचे अतिरिक्त पोलीस अधीक्षक सुरेशा चौबे यांनी एनडीटीव्हीशी बोलताना सांगितले.

---

## एकतर्फी प्रेमातून तरुणीवर कोयत्याने हल्ला! मज्जारज्जूला गंभीर इजा, अतिदक्षता विभागात उपचार

**पुणे/वृत्तसंस्था**

एकतर्फी प्रेमातून पालघर येथील जिल्हाधिकारी कार्यालयात महसूल सहायक म्हणून नोकरी करणाऱ्या तरुणीवर एकाने कोयत्याने वार केले. मानेवर तीन आणि पोटावर चार असे सात वार तिच्यावर करण्यात आले असून, मज्जारज्जूला गंभीर इजा झाली आहे. तिच्यावर सध्या पुण्यातील खासगी रुग्णालयाच्या अतिदक्षता विभागात उपचार सुरू असून प्रकृती चिंताजनक आहे.




या प्रकरणी पालघर पोलिसांनी तरुणाविरुद्ध खुनाच्या प्रयत्नाचा गुन्हा दाखल केला आहे. याबाबत तरुणीच्या चुलत्याने फिर्याद दिली आहे. तरुणीच्या हल्ल्याचा प्रकार सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाला आहे. ही घटना १२ जून रोजी सायंकाळी सव्वासहा वाजताच्या सुमारास पालघर येथील गोल्ड टॉकीजच्या जवळील रस्त्यावर घडली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तरुणी मुळची माण (जि. सातारा) तालुक्यात राहणारी आहे. तर आरोपी हा बीड जिल्ह्यातील. दोघेजण स्पर्धा परिक्षेची तयारी करत असताना एकाच क्लासमध्ये होते. ऑक्टोबर २०१५ मध्ये तरुणीची पालघर येथे महसुल सहायक म्हणून निवड झाली. तर तरुण उच्च न्यायालय येथे लिपीक म्हणून नोकरीला लागला. एकतर्फी प्रेम करणाऱ्या तरुणाने तिला लग्नासाठी मागणी घातली होती. मात्र, तिने नकार दिला. त्यामुळे तिने एक महिन्यापासून त्याच्याशी बोलणे बंद केले होते. ११ जून रोजी तरुणी घराकडे पायी चालत निघाली होती. त्यावेळी रस्त्यात अडवून तरुण तिला त्रास देऊ लागला होता. त्यावेळी ‘तू जर मला परत भेटला तर मी पोलिसात तक्रार करेन,’ असे तरुणीने त्याला सांगितले. दुसऱ्या दिवशी काम संपल्यानंतर रस्त्याने पायी चालत निघाली असताना तरुणाने तिला पाठलाग करून गाठले. काही कळण्याच्या आत त्याने तिच्यावर कोत्याने हल्ला केला. गंभीर जखमी झाल्याने ती रस्त्यात कोसळली. त्यानंतर तरुण तेथून पळून गेला. स्थानिकांनी तिला सुरूवातीला सरकारी रुग्णालयात दाखल केले. त्यानंतर पालघर येथील एका खासगी रुग्णालयात तिच्यावर उपचार करण्यात आले. मात्र, मज्जारज्जूला गंभीर इजा झाल्याने तिला पुण्यातील रुग्णालयात दाखल करण्यात आले. दोन दिवसापूर्वी तिच्यावर एक शस्त्रक्रिया झाली आहे. परंतु, अद्याप ती शुद्धीवर नसून, तिची प्रकृती चिंताजनक आहे. हल्ला केल्याची माहिती तिच्या एका मैत्रीणीने चुलत्यांना दिली. त्यानुसार त्यांनी पोलिसात तक्रार दिली आहे.

तरुणीवर हल्ला करून पसार झालेल्या आरोपीने विषारी औषध प्राशन केल्याची माहिती मिळाली आहे. त्याच्यावर सिल्वासा येथील खासगी रुग्णलयात उपचार सुरू असल्याचे सहायक पोलीस निरीक्षक मल्हार थोरात यांनी सांगितले.

## आटपाडीत कपाळावर चंद्रकोर असलेल्या ‘सुलतान’ नावाच्या गाढवाची चोरी

**सांगली/वृत्तसंस्था**

सोन्याचे दागिने, पैसा याचबरोबर वाहनांची चोरी होते. कधी कधी पाळीव प्राण्यांचीही चोरी होते. आता मात्र चक्क निरूपद्रवी म्हणून ओळख असलेल्या सुलतान नामक गर्दभाची चोरी झाली असून याबाबत आटपाडी पोलीस ठाण्यात चोरीची तक्रार दाखल करण्यात आली असून पोलीस चोरीस गेलेल्या गर्दभाचा आणि चोरट्याचा शोध घेत आहेत.

रोख रकमेसह सोन्या- चांदीचे दागिने, या मौल्यवान ऐवजाची नेहमी चोरी होते. ग्रामीण भागात गोठ्यात बांधलेल्या जनावरांची ही चोरी होत असते. आटपाडी तालुक्यात शेळ्या मेंढ्या पालनाचा अनेकांचा व्यवसाय आहे, दारात बांधलेल्या शेळ्या, बोकड, मेंढ्या चोरीला गेल्याच्या तक्रारीही दाखल होतात. गेल्या पंधरा दिवसांपुर्वी रानात कृषी पंपाच्या केबल चोरी मोठ्या प्रमाणात झाली होती. चोरट्यांना पकडून कारवाईसाठी शेतकऱ्यांनी पोलीस ठाण्यात आंदोलनही केले होते. पण आता चक्क गाढवाची चोरी झाल्याची घटना समोर आल्याने चर्चेचा विषय ठरला आहे.

आटपाडी पोलीस ठाण्यातून मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी लखन बापू जाधव (वय ३७, व्यवसाय - गाढव हाकणे, रा. करगणी, ता. आटपाडी) यांचे 'सुलतान' नावाचे गाढव दि. १० मे रोजी करगणी (ता. आटपाडी) येथे फिरत होते. गावातील अहिल्यादेवी होळकर चौक परिसरात ते फिरत असताना दुपारी दोन वाजणेच्या सुमारास गायब झाले. त्याची शोधाशोध केली असता गावात कुठेही आढळले नाही. चार दिवस शोध घेतल्यानंतर दि. १६ जून रोजी जाधव यांनी गाढवाची चोरी झाली असल्याची तक्रार आटपाडी पोलीस ठाण्यात दिली आहे. चोरी झालेल्या सुलतानाचे वर्णनही तक्रारीमध्ये नमूद करण्यात आले असून कपाळावर चंद्रकोर असलेले, उभट पायाचे गाढव चोरीस गेल्याचे तक्रारीत म्हटले आहे. गर्दभ चोरी प्रकरणी सावळज (ता. तासगाव) येथील एका संशयिताचे नावही तक्रारीत देण्यात आले असून पोलीसांनी त्याच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला, मात्र त्याने दूरध्वनीवरील संपर्क टाळला असून पोलीस चोरी करणाऱ्यासह गाढवाचा शोध घेत आहेत.

---

## पतीला घरात कोंडून पत्नीवर सामूहिक बलात्कार

**बेगुसराय/वृत्तसंस्था**

बिहारमधून एक धक्कादायक आणि संतापजनक घटना समोर आली आहे. बेगुसराय येथे पाच जणांनी घरात घुसून पतीला कोंडून, त्याच्या पत्नीवर सामूहिक बलात्कार केला. पीडित महिलेला पोटात तीव्र वेदना होत असल्याने नंतर रुग्णालयात दाखल करण्यात आले. उपचारादरम्यान डॉक्टरांनी तिच्या गुप्तांगातून एक जिवंत काडतूस, दगड आणि लाकडाचा तुकडा बाहेर काढला. ११ जून रोजी चकिया पोलीस ठाण्याच्या हद्दीत ही घटना घडली.

पीडित महिलेने दिलेल्या माहितीनुसार, रात्री सुमारे ११:३० वाजता ती शौचालयासाठी गेली असता, पाच जणांनी जबरदस्तीने घरात घुसून तिच्या पतीला एका खोलीत बंद केले. महिला बाहेर आल्यानंतर आरोपींनी तिचे तोंड दाबले आणि घराबाहेर एका निर्जन ठिकाणी नेऊन तिच्यावर बलात्कार केला. महिलेने आरडाओरडा करण्याचा प्रयत्न केला असता, ब्लेडने तिच्या छातीवर आणि मांडीवर वार करून जखमी करण्यात आले.

पीडितेने पुढे माध्यमांना दिलेल्या माहितीनुसार, “मी जाऊबाईला फोन केला, तिने येऊन माझ्या पतीची सुटका केली आणि



पोलिसांना बोलावले. पोलिसांनी आम्हाला रुग्णालयात जाण्यास सांगितले. आम्ही आधी बरौनी रुग्णालयात गेलो, तेथून आम्हाला सदर रुग्णालयात पाठवण्यात आले. तिथे माझ्यावर उपचार झाले, पण माझ्या गुप्तांगात सतत वेदना होत होत्या. वैद्यकीय तपासणीत डॉक्टरांनी सांगितले की, गुन्ह्यादरम्यान झालेल्या जखमांमुळे या वेदना होत आहेत. त्यानंतर आम्ही घरी गेलो. मात्र, वेदना असह्य झाल्याने आम्ही पुन्हा सदर रुग्णालयात आलो. यावेळी झालेल्या तपासणीत डॉक्टरांनी गुप्तांगातून एक काडतूस, दगड आणि लाकडाचा तुकडा काढला. मला अजूनही वेदना होत आहेत,” अशी कैफीयत पीडितेने सांगितली. अत्याचारादरम्यान बेशुद्ध पडल्यामुळे गुप्तांगात वस्तूं कोंबल्याचे समजले नाही, असे पीडितेने सांगितले.

### यापूर्वीही मारहाण, लैंगिक छळाचा प्रयत्न

तीन महिन्यांपूर्वीही तीन गुन्हेगारांनी घरात घुसून मारहाण केली होती आणि लैंगिक छळ करण्याचा प्रयत्न करून पैसे व दागिने लुटून नेल्याचा आरोप केला आहे. या घटनेची माहिती पोलिसांना देण्यात आली होती, परंतु त्यांनी कोणतीही कारवाई केली नाही, असेही पीडितेने म्हटले आहे. दरम्यान, या प्रकरणाचा तपास सुरु असल्याची माहिती उपविभागीय पोलीस अधिकारी आनंद कुमार पांडे यांनी माध्यमांना दिली आहे. “महिलेच्या गुप्तांगातून एक काडतूस बाहेर काढण्यात आले आहे,” असे डीएसपी पांडे म्हणाले. या प्रकरणातील गुन्हेगारांना लवकरच अटक करण्यात येईल असेही पांडे. यांनी सांगितले.

# ऑस्ट्रेलिया, दक्षिण आफ्रिका संघ विजयी

## बांगलादेश, पाकिस्तान संघ पराभूत : ऑस्ट्रेलियाची पेरी, द.आफ्रिकेची डर्कसन सामनावीर

■ **लीड्स, बर्मिंगहॅम/वृत्तसंस्था**

2026 च्या आयसीसी महिलांच्या टी-20 विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत खेळविण्यात आलेल्या गट-1 मधील सामन्यात ऑस्ट्रेलियाने बांगलादेशचा 9 गड्यांनी दणदणीत पराभव केला. तर याच गटातील दुसऱ्या एका सामन्यात दक्षिण आफ्रिकेने पाकचा 19 चेंडू बाकी ठेवून 2 गड्यांनी पराभव केला. ऑस्ट्रेलियाची एलीस पेरी आणि दक्षिण आफ्रिकेची अॅनेरी डर्कसन यांची 'सामनावीर' म्हणून निवड करण्यात आली. ऑस्ट्रेलियाने नाणेफेक जिंकून बांगलादेशला प्रथम फलंदाजी दिली. बांगलादेशने 20 षटकात 8 बाद 77 धावा जमवित ऑस्ट्रेलियाला विजयासाठी 78 धावांचे सोपे आव्हान दिले. ऑस्ट्रेलियाने 9.3 षटकात 1 बाद 78 धावा जमवित हा सामना 9 गड्यांनी जिंकला. या विजयाबरोबरच ऑस्ट्रेलियाने या सामन्यात 2 गुण मिळविले. स्पर्धेतील त्यांचा हा दुसरा सामना असून त्यांनी आपले दोन्ही सामने जिंकले आहेत.

बांगलादेशच्या डावात केवळ दोन फलंदाजांना दुहेरी धावसंख्या गाठता आली. कर्णधार निगार सुल्तानाने 47 चेंडूत 2 चौकारांसह 27 तर रितू मोनीने 26 चेंडूत 1 चौकारासह 16 धावा जमविल्या. ऑस्ट्रेलियातर्फे गार्थ, मॉलिन्यूक्स आणि एलीस पेरी यांनी प्रत्येकी 2 तर सदरलँड आणि वेरहॅम यांनी प्रत्येकी 1 बळी मिळविला. बांगलादेशने पॉवरप्लेमध्ये 22 धावा जमविताना 3 गडी गमविले. 14 षटकाअखेर बांगलादेशने 5 बाद 45 धावा केल्या होत्या. बांगलादेशचे अर्धशतक 91 चेंडूत नोंदविले गेले. त्यांच्या डावात 6 चौकार नोंदविले गेले.

प्रत्युत्तरादाखल खेळताना जॉर्जिया व्हॉल आणि बेथ मुनी या सलामीच्या जोडीने 26 चेंडूत 31 धावांची भागिदारी केली. बांगलादेशच्या मारुफाने मुनीला झेलबाद केले. तिने 10 चेंडूत 2 चौकारांसह 10 धावा जमविल्या. व्हॉल आणि एलीस पेरी या जोडीने दुसऱ्या गड्यासाठी अभेद्य 47 धावांची भागिदारी करुन विजयाचे सोपस्कार पूर्ण केले. व्हॉलने 32 चेंडूत 1 षटकार आणि 6 चौकारांसह नाबाद 45 तर पेरीने 15 चेंडूत 2 चौकारांसह नाबाद 19 धावा जमविल्या. ऑस्ट्रेलियाच्या डावात 1 षटकार आणि 10 चौकार नोंदविले गेले. ऑस्ट्रेलियाने पॉवरप्ले दरम्यानच्या पहिल्या 6 षटकात 49 धावा जमविताना 1 गडी गमविला. बांगलादेशतर्फे मारुफा अख्तरने 28 धावांत 1 गडी बाद केला.



या स्पर्धेतील गट-1 मधील झालेल्या अकराव्या सामन्यात दक्षिण आफ्रिकेने पाकिस्तानचा 19 चेंडू बाकी ठेऊन 2 गड्यांनी पराभव केला. दक्षिण आफ्रिकेच्या अॅनेरी डर्कसनला 'सामनावीर' म्हणून घोषित करण्यात आले. या स्पर्धेतील दक्षिण आफ्रिकेचा हा पहिला विजय आहे. त्यांना या सामन्यात 2 गुण मिळाले. पाकने 20 षटकात 9 बाद 126 धावा केल्या. त्यानंतर दक्षिण आफ्रिकेने 16.5 षटकात 8 बाद 127 धावा जमवित हा सामना 2 गड्यांनी जिंकला. पाकच्या डावामध्ये कर्णधार फातिमा सनाने नाबाद अर्धशतक झळकवले. तिने 38 चेंडूत 2 षटकार आणि 6 चौकारांसह नाबाद 55 धावा जमविल्या. तुबा हसनने 27 चेंडूत 2 चौकारांसह 23 तर अलिया रियाझने 10 धावा आणि इराम जावेद 2 चौकारांसह 11 धावा केल्या.

### संक्षिप्त धावफलक

■ बांगलादेश 20 षटकात 8 बाद 77 (निगार सुल्ताना 27, रितू मोनी 16, रबिया खान 8, अवांतर 7, गार्थ, मॉलिन्यूक्स आणि एलीस पेरी प्रत्येकी 2 बळी, सदरलँड आणि वेरहॅम प्रत्येकी 1 बळी), ऑस्ट्रेलिया 9.3 षटकात 1 बाद 78 (व्हॉल नाबाद 45, मुनी 10, एलीस पेरी नाबाद 19, अवांतर 4, मारुफा अख्तर 1-31).

## भारतीय हॉकी संघाचा जर्मनीवर विजय

■ **रॉटरडॅम/वृत्तसंस्था**

भारतीय हॉकी संघाने बुधवारी नेदरलँड्समधील रॉटरडॅम येथे विद्यमान विश्वविजेत्या जर्मनीचा 3-1 असा धक्कादायक पराभव करुन प्रो लीग 2025-26 हंगामातील आपला पहिला विजय नोंदवला. भारतासाठी मनदीप सिंग 7 व्या मिनिटाला, शिलानंद लाक्रा 13 व्या मिनिटाला आणि निलकांता शर्मा 35 व्या मिनिटाला यांनी प्रत्येकी एक गोल केला तर यजमान जर्मनीसाठी राफेल हार्टकॉफने 45 व्या मिनिटाला एक गोल नोंदवला. भारताचा मिडफील्डर हार्दिक सिंग याला सामनावीर म्हणून गौरविण्यात आले.

भारताने सुरुवातीपासून चेंडूवर नियंत्रण राखले. ज्याचा फायदा घेत सातव्या मिनिटाला मनदीपने गोलसमोर चपळाईने वळण घेत संघाला 1-0 अशी आघाडी मिळवून दिली. पहिल्या सत्राचा खेळ संपण्यापूर्वी, लाक्राने जर्मन गोलरक्षक अलेक्झांडर स्टॅडलरला चकवत उत्कृष्ट फटका मारला आणि भारताची आघाडी 2-0 अशी वाढवली. दुसऱ्या सत्रात जर्मनीने भारतीय क्षेत्रात घुसण्याचा प्रयत्न केला परंतु भारतीय बचाव फळी अभेद्य राहिली. त्यानंतर जर्मनीला दोन पेनल्टी कॉर्नर्स मिळाले.

त्यातील पहिला अमित रोहिदासने तर दुसरा गोलरक्षक मोहितने रोखून धरला आणि भारताची आघाडी कायम राखली .निलकांताने जर्मन बचावपटूंना चकवत एकट्याने चेंडू पुढे नेला आणि गोल करत भारताची आघाडी 3-0 अशी केली. तिसऱ्या सत्रात अवघे 20 सेकंद शिल्लक असताना 45 व्या मिनिटाला हार्टकॉफने जर्मनीसाठी पहिला गोल केला. मात्र खेळाचा वेग वाढवून आणि आक्रमक प्रयत्न करुनही जर्मन संघाला आणखी गोल करता आले नाहीत. 59 व्या मिनिटाला म्हणजेच सामना संपायला 90 सेकंद बाके असताना जर्मनीने शेवटचा हल्ला चढवला परंतु भारतीय बचाव फळीने तो प्रयत्न हाणून पाडला.

## कॉंगोविरुद्ध पोर्तुगालच्या वाट्याला अनपेक्षित बरोबरी

■ **ह्युस्टन/वृत्तसंस्था**



विश्वचषकाच्या सलामीच्या सामन्यात क्रिस्तियानो रोनाल्डो आणि त्याच्या पोर्तुगालच्या सहकाऱ्यांना कॉंगोविरुद्ध अनपेक्षितपणे 1-1 अशा बरोबरीवर समाधान मानावे लागले. 52 वर्षांनंतर पहिल्यांदाच विश्वचषकात खेळणाऱ्या कॉंगोने युरोपियन संघाविरुद्ध स्पर्धेची दमदार सुरुवात केली. त्यापूर्वी केप वर्देने स्पेनविरुद्ध गोलशून्य बरोबरी साधली होती. त्यानंतर अशी कामगिरी करणारा कॉंगो हा दुसरा आफ्रिकन देश ठरला आहे. विश्वचषक ही अशी स्पर्धा आहे जिथे अशा गोष्टी घडतात, असे पोर्तुगालचे प्रशिक्षक रॉबर्टो मार्टिनेझ नंतर म्हणाले. स्पॅनिश असलेल्या मार्टिनेझ यांनी 2018 च्या स्पर्धेत बेल्जियमला उपांत्य फेरीपर्यंत पोहोचवले होते.

एनआरजी स्टेडियमवर 68,777 प्रेक्षकांच्या उपस्थितीत हा सामना खेळला गेला. स्टेडियममध्ये प्रामुख्याने पोर्तुगालचे समर्थक होते. याआधी विश्वचषकात खेळल्यावेळी तिन्ही सामने गमावलेल्या कॉंगोने विश्वचषकातील आपला पहिला गुण यावेळी मिळवला. जुआंव नेव्हेसने सहाव्या मिनिटाला गोल करून पोर्तुगालला सुरुवातीलाच आघाडी मिळवून दिली. 5 फूट 7 इंच उंचीच्या या मिडफिल्डरने पेद्रो नेटोच्या क्रॉसवर हेडरद्वारे गोल केला. परंतु पहिल्या सत्राच्या अखेरीस स्टॉपेज टाइममध्ये आर्थर मासुअकूच्या क्रॉसवर योआन विसाने हेडरद्वारे गोल करून कॉंगोसाठी बरोबरी साधली.

कॉंगोच्या इतिहासातील हा पहिलाच विश्वचषक गोल होता. पोर्तुगालच्या बाबतीत गोल न होऊ शकणे ही बाब प्रकर्षाने जाणवली. रोनाल्डोने 68 व्या आणि 73 व्या मिनिटाला मारलेले फटके गोलपोस्टच्या उजवीकडून बाहेर गेले. दोन्ही वेळा त्याने नाराजी व्यक्त करत मान हलवली. त्यामुळे रोनाल्डोला मैदानाबाहेर काढण्याचा विचार केला होता का, असा प्रश्न मार्टिनेझ यांना विचारण्यात आला. जेव्हा गोलची गरज असते तेव्हा जगातील सर्वोत्तम गोल करणाऱ्या खेळाडूला बाहेर ठेवण्यात काहीच अर्थ नाही, असे प्रशिक्षक त्यावर म्हणाले. बॉक्समधील क्रिस्तियानोचा अनुभव महत्त्वाचा आहे. ज्या प्रकारे तो बचावपटूंना आपल्याकडे खेचून घेतो ते महत्त्वाचे आहे, असे त्यांनी सांगितले.

## इंग्लंडची विजयी सलामी, क्रोएशियावर मात ; ४ – २ ने मिळविला विजय

### कर्णधार हॅरी केनने नोंदविले दोन गोल, बेलिंगहॅम, रॅशफोर्ड यांचे एकेक गोल

■ **अर्लिंग्टन, टेक्सास/वृत्तसंस्था**

इंग्लंडने विश्वचषकाची सुरुवात दणदणीत पद्धतीने केली आहे. क्रोएशियाविरुद्धच्या 4-2 अशा विजयात हॅरी केनने दोन गोल करून विश्वचषकात सर्वाधिक गोल करण्याच्या इंग्लिश विक्रमाची बरोबरी केली, तर ज्युड बेलिंगहॅमने दुसऱ्या सत्राच्या दुसऱ्या मिनिटालाच इंग्लंडला निर्णायक आघाडी मिळवून दिली. 2018 च्या उपांत्य फेरीच्या सामन्याची ही लढत पुनरावृत्ती होती. तो सामना क्रोएशियाने जिंकला होता. केनच्या पहिल्या सत्रांमधील गोलांना मार्टिन बटुरिना आणि पेटार मुसा यांनी गोल करून प्रत्युत्तर दिले. पहिल्या सत्राच्या समाप्तीची शिट्टी वाजण्यापूर्वी शेवटच्या क्षणी मुसाने गोल केला.

पण खेळ पुन्हा सुरू झाल्यावर ही बरोबरी फार काळ टिकली नाही. बेलिंगहॅमने इलियट अँडरसनकडून एक लांब पास घेतला आणि बचावपटूपासून दूर राहून गोलरक्षक डॉमिनिक लिवाकोविचला चकवत एक फटका मारला, जो खांब्याला आदळून जाळीत गेला. 85 व्या मिनिटाला मार्कस रॅशफोर्डने इंग्लंडच्या या आघाडीत आणखी भर घातली. रियाल माद्रिदच्या बेलिंगहॅमने आपला सातवा आंतरराष्ट्रीय गोल केल्यानंतर लगेचच गोल करण्याची आणखी एक उत्तम संधी त्याला मिळाली होती. पण लिवाकोविचने तो प्रयत्न निष्फळ ठरविला. इंग्लंडच्या वेगवान आक्रमणांदरम्यान काही मिनिटांतच आणखी अर्धा डझन वेळा तरी चेंडू अडवून गोल रोखले गेले.

क्रोएशियाच्या मुसाच्या माध्यमातून मेजर लीग सॉकरमधील डॅलस संघाकडून खेळणाऱ्या खेळाडूचा विश्वचषकातील पहिला गोल नोंदवला गेला. मुसाने इव्हान पेरिसिचच्या हेडरचा पाठपुरावा केला आणि चेंडू खाली न पडू देता मारलेल्या फटक्याद्वारे गोलरक्षक जॉर्डन पिकफोर्डला चकवून गोल केला. पिकफोर्डला 36 व्या मिनिटाला बाटुरिनाच्या फटक्यामुळेही गोल स्वीकारावा लागला होता. डाव्या कोपऱ्यात मारलेला तो फटका पिकफोर्डच्या हाताला स्पर्श करून गेला होता. इंग्लंडचा पुढील सामना मॅसॅच्युसेट्समधील फॉक्सबरो येथे 'गट एल'मध्ये घानाशी होणार आहे. याच दिवशी टोरंटोमध्ये क्रोएशियाचा सामना पनामाशी होईल.



32 वर्षीय केनचा पहिला गोल पेनल्टी किकच्या दुसऱ्या संधीवर झाला. कारण पहिल्या प्रयत्नात गोलरक्षक लिवाकोविचने चेंडू अडवला होता, परंतु व्हिडिओ रिव्ह्यूमध्ये केनने फटका मारताना लिवाकोविचचे दोन्ही पाय गोल-लाइनच्या बाहेर असल्याचे दिसून आले, ज्यामुळे तो प्रयत्न रद्द करण्यात आला. दुसऱ्या प्रयत्नात केनने पुन्हा उजव्या खांबाच्या दिशेनेच फटका मारला, तर लिवाकोविचने विरुद्ध दिशेला झेप घेतली. लुका मॉड्रिच या 40 वर्षीय मिडफील्डरने नोनी माडुएकेच्या मांडीवर लाथ मारल्यामुळे ही पेनल्टी देण्यात आली होती. त्यानंतर डेक्लान राईसच्या कॉर्नर किकवर जोरदार हेडर मारून लिवाकोविचला सहज चकवत केनने गोल केला. त्याच्या नावावर आता 81 आंतरराष्ट्रीय गोल जमा आहेत.

# प्रसिद्ध सोशल मीडिया इन्फ्लुएंसरचं 36 व्या वर्षी निधन; पोटाच्या कॅन्सरशी झुंज ठरली अपयशी





फिटनेस सोशल मीडिया इन्फ्लुएंसर कार्ली डग्लस हिचं वयाच्या अवघ्या 36व्या वर्षी निधन झालंय. तीन मुलांची आई असलेल्या कार्लीने काही महिन्यांपूर्वीच स्वतःला चौथ्या टप्प्यातील पोटाचा कॅन्सर झाल्याची माहिती दिली होती. या धक्कादायक निदानानंतर अवघ्या तीन महिन्यांत तिची कॅन्सरशी झुंज अपयशी ठरली. तिच्या निधनानंतर कुटुंबीयांनी सोशल मीडियावर शेअर केलेली भावनिक पोस्ट सध्या मोठ्या प्रमाणात व्हायरल होतेय.

कार्लीच्या कुटुंबीयांनी शेअर केलेल्या पोस्टमध्ये तिच्या शेवटच्या दिवसांबद्दल आणि कॅन्सरविरुद्ध दिलेल्या संघर्षाबद्दल माहिती दिलीये. स्टेज 4 पोटाच्या कॅन्सरचं निदान झाल्यानंतरही तिने जगण्याची आशा कधीच सोडली नाही. कठीण परिस्थितीतही ती धैर्याने उभी राहिली. तिचा देवावरील विश्वास कायम होता आणि भेटणाऱ्या प्रत्येकाला ती श्रद्धा आणि सकारात्मकतेचा संदेश देत असे. कुटुंबीयांच्या म्हणण्यानुसार, 13 जून 2026 रोजी कार्लीने अखेरचा श्वास घेतला. त्या वेळी तिच्या जवळ तिची लाडकी मुलं होती आणि त्यांच्या सहवासातच तिने या जगाचा निरोप घेतला.

कुटुंबीयांनी पोस्टमध्ये कार्लीच्या स्वभावाबद्दल सांगताना म्हटलंय की, ती जणू आनंदाचे दुसरं नाव होती. तिच्या चेहऱ्यावर कायम हास्य असायचं आणि तिचं हसणं आजूबाजूच्या लोकांनाही आनंद देत असे. जो कोणी तिच्या संपर्कात आला त्याला तिच्याकडून प्रेम आणि आपुलकीच मिळाली. तिची तीन मुलं रिव्हर, फे, आणि टाउन्स हेच तिच्या आयुष्यातील सर्वात मोठं सुख होतं. मुलांसोबत घालवलेला प्रत्येक क्षण ती मनापासून जगत होती. त्यांच्या हसण्यात, खेळण्यात आणि सहवासात तिचा खरा आनंद होता. आई होणं हेच तिच्यासाठी सर्वात मोठा सन्मान आणि समाधानाचं कारण होतं.

कार्लीच्या कुटुंबीयांनी तिच्या पती डेव्हिडबद्दलही भावना व्यक्त केल्या. त्यांच्या मते, डेव्हिड हा केवळ तिचा पती नव्हता, तर तिचा सर्वात जवळचा मित्र होता. रोज संध्याकाळी तो घरी येण्याची ती आतुरतेने वाट पाहायची. दोघांचं नातं खूप घट्ट आणि प्रेमळ होतं. त्यांच्या आयुष्यातील प्रत्येक क्षणात हे प्रेम दिसून येत असे. घरातील वातावरणही या प्रेमामुळे अधिक सुंदर बनलं होतं. कार्लीच्या आयुष्यात तिच्या आई-वडिलांचं स्थान खूप महत्त्वाचं होतं. कुटुंबीयांनी सांगितलं की, ती आपल्या पालकांवर मनापासून प्रेम करत होती. विशेषतः तिच्या आईसोबत तिचं अतिशय खास नातं होतं. तिची आई ही फक्त पालक नव्हती, तर तिची सर्वात जवळची मैत्रीण होती. आयुष्यातील प्रत्येक चांगल्या-वाईट प्रसंगी आईने तिला आधार दिला. त्यामुळे तिच्या जाण्याने कुटुंबीयांवर मोठा दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

पोस्टमध्ये असंही म्हटलंय की, कार्लीच्या जाण्याने निर्माण झालेली पोकळी कधीच भरून निघणार नाही. मात्र तिच्या कुटुंबीयांना विश्वास आहे की, ती आता दुःख आणि वेदनांपासून मुक्त झाली आहे आणि अधिक शांत, आनंदी अवस्थेत आहे. कार्ली डग्लस सोशल मीडियावर तिच्या कॅन्सरविरुद्धच्या लढ्याबद्दल नियमितपणे माहिती देत होती. उपचारांदरम्यानचे अनुभव, भावनिक क्षण आणि आशावादी संदेश ती तिच्या फॉलोअर्ससोबत शेअर करत असे. तिच्या निधनानंतर अनेकांनी तिच्या आठवणींना उजाळा दिला. एका चाहत्याने लिहिलंय की, कॅन्सरचे निदान झाल्यानंतरही कार्लीने आयुष्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलला नाही. ती शेवटपर्यंत प्रेम, विश्वास आणि सकारात्मकतेचा संदेश देत राहिली.

## प्रसिद्ध गायकाचे कॅन्सरमुळे निधन

गायक ॲलेक्स बुएनो यांचे वयाच्या ६२ व्या वर्षी निधन झाले. कॅन्सरशी दीर्घकाळ सुरू असलेल्या लढाईनंतर त्यांनी अखेरचा श्वास घेतला. त्यांच्या निधनामुळे संगीतसृष्टीवर शोककळा पसरली असून चाहत्यांसह अनेक कलाकारांनी त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहिली आहे. ॲलेक्स बुएनो हे डोमिनिकन रिपब्लिकमधील सर्वाधिक लोकप्रिय गायकांपैकी एक होते. विशेषतः मेरेंग्यू आणि बाचाटा या संगीतप्रकारांमधील त्यांच्या योगदानामुळे त्यांनी आंतरराष्ट्रीय स्तरावर मोठी ओळख निर्माण केली होती. त्यांच्या आवाजातील वेगळेपणा आणि भावपूर्ण गायकीमुळे त्यांनी लाखो चाहत्यांची मने जिंकली होती. ॲलेक्स बुएनो गेल्या काही काळापासून कॅन्सरने त्रस्त होते. त्यांच्यावर उपचार सुरू होते, मात्र प्रकृती सातत्याने खालावत गेली. अखेर उपचारादरम्यान त्यांचे निधन झाले. त्यांच्या निधनाची बातमी समोर आल्यानंतर सोशल मीडियावर अनेक चाहत्यांनी आणि कलाकारांनी त्यांना श्रद्धांजली अर्पण केली. चाहत्यांनी त्यांच्या गाण्यांच्या आठवणींना उजाळा दिला आहे. ॲलेक्स बुएनो यांनी आपल्या कारकिर्दीत अनेक लोकप्रिय गाणी सादर केली.

***

## 'हवामान बदलाला पुरुषच जबाबदार'



बॉलिवूड अभिनेत्री आणि पर्यावरण प्रेमी दिया मिर्झा सध्या एका वक्तव्यामुळे चर्चेत आली आहे. हवामान बदल आणि पर्यावरण संकटासाठी पितृसत्ताक व्यवस्थेला जबाबदार ठरवणाऱ्या तिच्या विधानामुळे सोशल मीडियावर मोठा वाद निर्माण झाला आहे. अनेकांनी तिच्या वक्तव्यावर टीका केली असून, त्यानंतर अभिनेत्रीने सोशल मीडियाच्या माध्यमातून आपली भूमिका स्पष्ट केली आहे. दिया मिर्झा ही अभिनेत्री असण्यासोबतच संयुक्त राष्ट्रांच्या पर्यावरण कार्यक्रमाची (UNEP) गुडविल ॲम्बेसेडर म्हणूनही कार्यरत आहे. अलीकडेच अभिनेत्री सोहा अली खानच्या पॉडकास्टमध्ये सहभागी झालेल्या दियाने हवामान बदलाच्या मुद्द्यावर भाष्य केले. यावेळी बोलताना तिने हवामान बदलण्याच्या संकटामागील एक मोठे कारण म्हणजे पितृसत्ताक व्यवस्था असल्याचे म्हटले.

संवादादरम्यान दिया म्हणाली की, हवामान बदलाला चालना देणाऱ्या अनेक निर्णयांमध्ये पुरुषप्रधान व्यवस्थेचा मोठा प्रभाव आहे. त्यावर सोहा अली खानने 'पुरुषी अहंकार' हा मुद्दा उपस्थित केला. त्यावर प्रतिक्रिया देताना दियाने सांगितले की, जगभरातील अनेक शोषणकारी आणि वर्चस्ववादी व्यवस्था हवामान बदलासाठी जबाबदार आहेत आणि या व्यवस्थांचे नेतृत्व प्रामुख्याने पुरुषांकडे राहिले आहे. या वक्तव्यानंतर सोशल मीडियावर तिच्यावर टीकेची झोड उठली. अनेकांनी तिच्या विधानाला पुरुषविरोधातील भूमिका असल्याचे म्हटले. वाढत्या ट्रोलिंगनंतर दियाने सोशल मीडियावर एक सविस्तर पोस्ट शेअर करत आपला मुद्दा स्पष्ट केला. दिया म्हणाली की, हवामान बदल हे केवळ पर्यावरणीय संकट नसून ते सामाजिक आणि आर्थिक असमानतेशीही जोडलेले आहे. शतकानुशतके निसर्गाकडे केवळ साधन म्हणून पाहण्याची वृत्तीमुळे आजची परिस्थिती निर्माण झाली आहे. ती पुढे म्हणाली की, महिलांना आणि मुलींना हवामान बदलाचे परिणाम सर्वप्रथम आणि सर्वाधिक प्रमाणात भोगावे लागतात. पाणीटंचाई, अन्नसुरक्षेचा प्रश्न, विस्थापन आणि उपजीविकेचे नुकसान यांसारख्या समस्यांचा महिलांवर अधिक परिणाम होतो. मात्र पर्यावरणविषयक निर्णयप्रक्रियेत त्यांचा सहभाग अद्यापही मर्यादित आहे.



# “सर्वांना वाईट दिवस...”; बॉलीवूडमधील नेपोटिझमवर स्पष्टच बोलली आलिया भट्ट

बॉलीवूडची लोकप्रिय अभिनेत्री आलिया भट्ट ही आगामी 'अल्फा' चित्रपटामुळे चर्चेत आली आहे. या सिनेमाचा ट्रेलर लॉन्च झाला असून ती जोरदार प्रमोशन करत आहे. 'अल्फा'मध्ये आलिया ॲक्शन स्पाय लूकमध्ये दिसून येणार आहे. तिच्यासह या सिनेमात अभिनेत्री शर्वरी वाघदेखील झळकणार आहे. आलिया भट्ट ही मागील १४ वर्षांपासून प्रेक्षकांचे मनोरंजन करीत असून तिचे चित्रपट सुपरहिट ठरले आहेत. मात्र अनेकदा तिला नेपोटिझमवरुन बोलले जाते. याबाबत आता आलियाने तिची भूमिका मांडली आहे. तिला संधी मिळत असल्या तरी तिने करिअरमध्ये संघर्षकाळ अनुभवला असल्याचे वक्तव्य केले आहे.

मुलाखतीमध्ये अभिनेत्री आलिया भट्टने बॉलीवूडमधील करिअरबाबत सांगितले आहे. लहानपणापासून तिने फक्त अभिनेत्री होण्याची स्वप्ने पाहिली असल्याचे सांगितले आहे. आलिया भट्ट म्हणाली की, खरं सांगायचं तर, अनेक वर्षांपासून मी फक्त अभिनय करत आहे. लहानपणी आरशासमोर उभे राहून मी अभिनय करत होते. त्यावेळी माझ्या डोक्यामध्ये फक्त एकच विचार असायचा की, समोर जो टीव्ही आहे, एकदिवस मला या टीव्हीमध्ये झळकायचे आहे"

आलियाला लहानपणापासून मनोरंजन क्षेत्राच्या दुनियेचे कुतूहल होते. सिनेविश्वात तिचे ध्येय असल्याचे तिला माहीत होते. ती फक्त अभिनेत्री होण्याच विचार करत असे. आलिया लहानपणापासून गोविंदा व करिश्मा कपूर यांची गाणी खूप मन लावून पाहत असे. चित्रपट, कॅमेरा आणि अभिनय तिला नेहमीच आकर्षित करायचे. आलिया भट्टने तिला अनेक संधी मिळाल्या असल्या तरी कठीण काळसुद्धा अनुभवला असल्याचे वक्तव्य केले आहे.

अभिनेत्री आलिया भट्टने तिला इतरांपेक्षा अधिक संधी सहज मिळाल्याचे कबूल केले. ती म्हणाली की, माझा प्रवास हा नक्कीच इतरांपेक्षा वेगळा राहिला आहे. मला अनेकदा संधी मिळाल्या आहेत. पण याचा अर्थ असा होत नाही की आयुष्यात काहीच अडचणी किंवा संघर्ष येणार नाहीत. मी सुद्धा अनेकदा संघर्ष केला आहे. माझ्या वेगळ्या अडचणी होत्या. पण अशावेळी स्वतःवर विश्वास ठेवला पाहिजे. स्वप्न पाहण्याचा आणि पुढे जाण्याचा हक्क प्रत्येकाला आहे. त्यामुळे संघर्ष आला तरी त्यातून पुढे जाता आले पाहिजे" अभिनेत्री आलिया भट्ट हिने तिची लेक राहा कपूरबद्दलही मत व्यक्त केले. राहाच्या करिअरबाबत आलिया म्हणाली की, माझी मुलगी अजून लहान आहे. ती रोज नवनवीन गोष्टी शिकत असते. विविध प्रकारचे खेळ आणि उपक्रमांमध्ये सहभागी व्हायला तिला खूप आवडते. राहाला चित्रपटांची आवड आणि तिला गाणी ऐकायला तसेच डान्स करायला खूप आवडतो. राहामध्ये नेतृत्व करण्याचा गुण आहे. त्यामुळे मला वाटते की राहासुद्धा अभिनय क्षेत्रात काम करू शकेल. ती रंगमंचासाठी बनली आहे.

# रविकांत तुपकर यांच्या अन्न त्याग आंदोलनाला समाजवादी पार्टीने दिला पाठिंबा

जनसंचलन/बुलढाणा




राज्य सरकारने शेतकऱ्यांना कर्जमाफीची घोषणा केली आहे परंतु हे कर्जमाफी फसवी असल्याचा आरोप करत क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष रविकांत तुपकर यांनी अन्य त्याग आंदोलन सुरू केले असून या आंदोलनाला भरभरून पाठिंबा मिळत आहे आज १८ जून रोजी समाजवादी पार्टीचे बुलढाणा जिल्हाध्यक्ष याकूब खान पठाण हे आपले कार्यकर्त्यांसह आंदोलन स्थळी पोहोचले व त्यांनी या आंदोलनाला आपला जाहीर पाठिंबा दिला आहे. शोषित,पीडित आणि शेतकऱ्यांसाठी समाजवादी पार्टी नेहमी काम करत आहे.महाराष्ट्र राज्यात कर्जमाफीच्या नावावर शेतकऱ्यांची मोठी फसवणूक झाली असून बुलढाण्यात रविकांत तुपकर यांचे अन्नत्याग आंदोलनाला पाठिंबा देण्याचे निर्देश समाजवादी पार्टीचे प्रदेशाध्यक्ष आ.अबू आसिम आजमी यांनी जिल्हाध्यक्षांना दिले होते, त्यानुसार बुलढाणा जिल्हा अध्यक्ष याकूब खान पठाण व इतर पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी आज गुरुवारी दुपारी आंदोलन स्थळी जाऊन शेतकरी नेते रविकांत तुपकर यांची भेट घेतली व पाठिंब्याचा पत्र त्यांना सुपूर्द केला. यावेळी जिल्हा सचिव रमेश सोर यांच्यासह इतर पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येत उपस्थित होते.

# चिखलीत आंतरराष्ट्रीय योग दिन (२१ जून) उत्साहात साजरा होणार

जनसंचलन/बुलढाणा

संयुक्त राष्ट्रसंघाने २१ जून हा दिवस आंतरराष्ट्रीय योग दिन म्हणून घोषित केला असून, यंदा १२ वा आंतरराष्ट्रीय योग दिन चिखली येथे उत्साहात साजरा करण्यात येणार आहे. तालुका प्रशासन चिखली, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय बुलढाणा, तालुका क्रीडा संकुल समिती चिखली तसेच शहरातील विविध योग संस्था व संघटनांच्या संयुक्त विद्यमाने हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. आयुष मंत्रालयाच्या निर्देशित मानकांनुसार रविवार, दि. २१ जून २०२६ रोजी सकाळी ७ ते ७.४५ या वेळेत तालुका क्रीडा संकुल, चिखली येथे सामूहिक योग प्रात्यक्षिकांचे आयोजन करण्यात आले आहे. योगामुळे व्यक्तीच्या शारीरिक, मानसिक व आत्मिक विकासाला चालना मिळते. तसेच निरोगी, सुसंस्कृत आणि जागरूक नागरिक घडविण्यास योगविद्या महत्त्वाची भूमिका बजावते. योगाचा प्रचार-प्रसार करून समाजात आरोग्याबाबत कायमस्वरूपी जनजागृती निर्माण करणे हा या उपक्रमामागील प्रमुख उद्देश आहे.या कार्यक्रमात शहरातील सर्व शाळा, महाविद्यालये, शैक्षणिक संस्था, शासकीय व निमशासकीय कार्यालयांतील अधिकारी-कर्मचारी, नेहरू युवा केंद्र, पोलीस विभाग, महिला मंडळे, क्रीडा मंडळे, एनसीसी, एनएसएस, भारत स्काऊट-गाईड, क्रीडा भारती, आरोग्य भारती, आर्ट ऑफ लिव्हिंग, योग विद्याधाम, योगांजली योग वर्ग, पतंजली योग समिती, विविध क्रीडा संघटना, शारीरिक शिक्षण शिक्षक संघटना, आयुर्वेद व नर्सिंग महाविद्यालये तसेच योग क्षेत्रात कार्यरत संस्था सहभागी होणार आहेत. योग दिन कार्यक्रमात क्रीडाप्रेमी नागरिक, युवक-युवती तसेच सर्व क्षेत्रातील नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन योगाचा संदेश जनतेपर्यंत पोहोचवावा, असे आवाहन तालुका क्रीडा अधिकारी बी. एस. महानकर यांनी केले आहे. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी विविध विभाग व संस्थांकडून तयारी पूर्ण करण्यात आली असून, चिखली शहरात योग दिनाबाबत उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

# जिल्हाधिकाऱ्यांचा प्रेरणादायी पुढाकार; टीबी रुग्णाला सहा महिन्यांसाठी दत्तक....



जनसंचलन/बुलढाणा

प्रधानमंत्री टीबी मुक्त भारत अभियानाला गती देण्यासाठी आणि जिल्ह्यातून क्षयरोगाचे समूळ उच्चाटन करण्याच्या उद्देशाने बुलढाण्याचे जिल्हाधिकारी डॉ. प्रवीणकुमार देवरे यांनी एक कौतुकास्पद पुढाकार घेतला आहे. त्यांनी स्वतः पुढे येत एका टीबी रुग्णाला पुढील सहा महिन्यांसाठी दत्तक घेतले असून, या कालावधीत त्याच्या पोषण आहाराची संपूर्ण जबाबदारी स्वीकारली आहे. केंद्र व राज्य शासनामार्फत राबविण्यात येणाऱ्या ङ्गनिक्षय मित्रफ्योजनेअंतर्गत टीबी रुग्णांना आवश्यक पोषण सहाय्य उपलब्ध करून दिले जाते. टीबीवर मात करण्यासाठी औषधोपचाराबरोबरच सकस व पौष्टिक आहाराची आवश्यकता लक्षात घेऊन जिल्हाधिकारी डॉ. देवरे यांनी संबंधित रुग्णाची भेट घेत त्याला पोषण आहाराचे किट सुपूर्द केले. यावेळी जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ. वर्षा गुट्टे तसेच क्षयरोग केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ. दिनकर खेरोडकर उपस्थित होते. दत्तक कालावधीत रुग्णाला दरमहा देण्यात येणाऱ्या न्यूट्रिशन किटमध्ये गहू, ज्वारी किंवा बाजरी, डाळी, खाद्यतेल तसेच दूध अथवा दूध पावडर यांचा समावेश करण्यात आला आहे. या पोषण सहाय्यामुळे रुग्णाच्या उपचारांना अधिक बळ मिळणार आहे. याप्रसंगी जिल्हाधिकारी डॉ. प्रवीणकुमार देवरे यांनी नागरिकांना आवाहन करताना सांगितले की, टीबी हा केवळ आरोग्याचा विषय नसून सामाजिक जबाबदारीचा भाग आहे. समाजातील दानशूर व्यक्ती, लोकप्रतिनिधी, अधिकारी, स्वयंसेवी संस्था आणि उद्योजक यांनी मोठ्या संख्येने ङ्गनिक्षय मित्रफ म्हणून नोंदणी करून टीबी रुग्णांना मदतीचा हात द्यावा. प्रत्येक रुग्णाला पोषण आहार आणि मानसिक आधार मिळाल्यास बुलढाणा जिल्हा लवकरच टीबीमुक्त होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. जिल्हाधिकाऱ्यांच्या या संवेदनशील आणि प्रेरणादायी उपक्रमामुळे जिल्ह्यातील विविध विभागांतील अधिकारी तसेच नागरिकांमध्येही ङ्गनिक्षय मित्रफ्बनून टीबी रुग्णांच्या मदतीसाठी पुढे येण्याची प्रेरणा निर्माण होत आहे.

# पाणी टंचाई निवारणार्थ बुलढाणा तालुक्यातील साखळी बु. गावासाठी टँकर मंजूर

जनसंचलन/बुलढाणा

पाणी टंचाईची तीव्रता लक्षात घेता बुलढाणा तालुक्यातील साखळी बु. गावासाठी पाणी पुरवठ्याकरिता टँकर मंजूर करण्यात आले आहे. आदेशात ठरवून दिल्याप्रमाणे नियमित टँकरव्दारे पाणी पुरवठा केल्या जाणार आहे, अशी माहिती उपविभागीय अधिकारी यांनी दिली. साखळी बु. येथे २८५९ पशुधन व ७६८९ लोकसंख्येसाठी एक टँकरद्वारे १ लाख ६१ हजार ६९५ लिटर्स पाणी पुरवठा दररोज करणार आहेत. पाणी टंचाईची तीव्रता लक्षात घेता पाणी पुरवठ्याकरिता टँकर मंजूर करण्यात आले आहे. टँकरने केलेल्या खेपांची ग्रामपंचायतीला नोंद घेण्यात यावी. नोंदवहीची तपासणी नियमितपणे गटविकास अधिकारी यांनी करावी. निविदाधारकाने टँकर नादुरूस्त झाल्यास त्वरित दुसरे टँकर उपलब्ध करून द्यावे, असे उपविभागीय अधिकारी, बुलढाणा यांनी प्रसिद्धीपत्रकाव्दारे कळविले आहे.



# हॅलो बुलढाणाच्या बातमीनंतर एफ.डी.ए ॲक्शन मोडवर; जय अंबे स्वीट मार्टवर व्यवसाय बंदची नोटीस, पोलिसात गुन्हा दाखल!

**जनसंचलन- मेहकर**

काही तासांपूर्वी हॅलो बुलढाणाने जानेफळ येथील कथित मिठाई कांडाची बातमी प्रसारित करताच प्रशासनाला अखेर जाग आली असून या प्रकरणात मोठा दणका बसला आहे. जय अंबे स्वीट मार्टशी संबंधित असल्याचा दावा केला जाणारा, मैदा पायाने तुडवतानाचा कथित व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर नागरिकांमध्ये संतापाचा उद्रेक झाला होता. हॅलो बुलढाणाने हा प्रश्न थेट जनतेच्या आरोग्याशी जोडत अन्न व औषध प्रशासनाला सवाल विचारला होता. त्यानंतर अन्न सुरक्षा अधिकारी श्री. अक्षय संजय भोपाळे यांनी कार्यालयीन प्रमुख प्रमोद पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली तातडीने कारवाई करत जानेफळ पोलीस स्टेशनमध्ये लेखी फिर्याद दाखल केली असून, या प्रकरणात संबंधितांवर गुन्हा दाखल झाल्याची माहिती समोर आली आहे. दि. १८ जून २०२६ रोजी अन्न सुरक्षा अधिकारी भोपाळे यांनी मे. श्री जय अंबे स्वीट मार्ट, अमडापूर रोड, जानेफळ या आस्थापनेची सखोल तपासणी केली. तपासणीदरम्यान अन्न सुरक्षा व मानदे कायदा २००६ तसेच अन्न व्यवसायिक परवाना व नोंदणी नियमन २०११ मधील परिशिष्ट ४ भाग १ च्या तरतुदींचे उल्लंघन झाल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे.



याच अनुषंगाने संबंधित अन्न व्यावसायिकाला व्यवसाय बंद करण्याची नोटीस देण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. फिर्यादीत नमूद केल्यानुसार, श्री. भवाराराम हिराराम प्रजापत यांच्या मालकीच्या या आस्थापनेबाबत व्हिडिओ व्हायरल झाला होता. विचारणा केली असता, व्हिडिओत दिसणारा इसम मादाराम गोकलराम प्रजापत हा पूर्वी कामावर असल्याचे सांगण्यात आले. तसेच तो सध्या दुकानात कामावर नसल्याचेही सांगण्यात आले. अधिकाऱ्यांनी संबंधित ठिकाणी जाऊन पाहणी केली असता तेथे अन्नपदार्थाचा साठा किंवा उत्पादन चालू असल्याचे आढळले नाही, मात्र नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण होईल अशी गंभीर स्थिती निर्माण झाल्याचा ठपका ठेवण्यात आला आहे. या प्रकरणात अन्न सुरक्षा व मानदे कायदा २००६ चे कलम ५९() तसेच भारतीय न्याय संहितेचे कलम २७४, २७५ अन्वये कारवाईची मागणी करण्यात आली असून, पोलिसांकडून गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपासणी अहवाल, पंचनामा, बयान आणि संबंधित कागदपत्रेही सहपत्र म्हणून जोडण्यात आल्याची माहिती आहे. प्रशासनाने केवळ नोटीसवर थांबू नये, तर निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कडकात कडक कारवाई करावी अशी जनतेतून मागणी होत आहे जनहितार्थ संदेश नागरिकांनी मिठाई, नाश्ता किंवा कोणताही खाद्यपदार्थ खरेदी करताना स्वच्छता, परवाना आणि उत्पादनाची स्थिती तपासावी. संशयास्पद प्रकार दिसल्यास तात्काळ अन्न व औषध प्रशासन आणि स्थानिक पोलिसांना कळवा. जनतेच्या आरोग्याशी खेळ करणाऱ्यांना उघडे पाडणे हीच खरी समाजसेवा आहे.

# वारकरी संत परपरा आणि भारतीय संविधान परस्पर पूरकच- ह भ प श्यामसुदर सोन्नर महाराज

**जनसंचलन/बुलढाणा**

जातपात,धर्म, पंथविरहित असुन यात अनेक जातीच्या, धर्माच्या आणि पंथाच्या संतानी, कीर्तनकारानी कार्य केलेलं आहे,आजही करत आहे या परंपरेत जातीभेद, धर्मभेद पंथभेदाला थारा नाही. गेल्या अनेक वर्षांपासून या परंपरेनं सातशे वर्षापासून समाज प्रबोधनाद्वारे भक्कमपणे सामाजिक व सांस्कृतिक सिंचनातून समाज एकत्रीत बांधून ठेवला आहे नंतरच्या काळात डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी आदर्श भारतीय संविधानात हीच संतानी दिलेल्या मानवीमूल्याची पेरणी करून विविध कायद्यातून माणूस, समाज व भारत देश संघटित, विकसीत आणि एकत्रीत कसा राहील यासाठी प्रयत्न केले आहेत. म्हणजे जी समाजमूल्ये, मानव कल्याणाची मूल्ये आमचे संत नामदेव, ज्ञानेश्वर, तुकाराम, जनाबाई, बहिणाबाई, सावता महाराज यांनी वारकरी संत परंपरेतून दिली तीच मूल्ये स्वातंत्र्य,समता,बंधुता भारतीय संविधनाद्वारे डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी दिलीत म्हणजे भारतीय संविधान ही वारकरी संत परंपरेची आधुनिक काळात नवी आवृत्ती म्हणता येईल असे विचार ह भ प श्यामसुंदर सोन्नर महाराज यांनी बुलढाणा येथे भक्तिसंगम समूह बुलढाणाद्वारा आयोजित संत साहित्यातील संविधानिक मूल्ये ✻संविधान जागर किर्तन✻कार्यक्रमात निरूपण करतांना मांडले.पंढरपुरच्या वारीत लहान मोठा, स्त्री पुरुष असा भेदाभेद नाही. सर्वांना समान समजले जाते.त्यामुळे या वर्षिच्या संविधान दिंडी आषाढी वारीत बुलडानेकरांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन सुद्धा केले.



या कीर्तन सोहळ्यासाठी शिवसेना नेते श्री विजय अंभोरे, सौ जयश्रीताई शेळके, ॲड बाबासाहेब भोंडे,श्रीदामोदरजी बिडवे, सौ विजयालक्ष्मी वानखेडे, प्रा डॉ एस एम कानडजे , डॉ श्रीमती व्यवहारे, प्रा कि वा वाघ, प्रा कमलेश खिल्लारे,श्री चंद्रशेखर केणे आदी मान्यवर उपस्थित होते. किर्तन सोहळ्याचे उत्कृष्ट संचालन प्रा रवींद्र साळवे यांनी केले तर आभार प्रदर्शन कॉम्रेड पंजाबरावकवाड यांनी केले. किर्तन सोहळा यशस्वी करण्यासाठी ॲड जयसिंग देशमुख, सुरेश साबळे, प्रदीप हिवाळे, शाहीना पठाण, डॉ विजयाताई काकडे,प्रज्ञा लांजेवार, अनिता कापरे, मिलिंद वानखेडे, प्रा जे जे जाधव, विनोद चिंचोली,एड संतोष वानखेडे, सौ. वैशाली वैराळकर ,सौ. ज्योती डोंगरदेवी,मुकुंद पारवे, सुरेश सरकटे, शैलेश खेडकर, प्रेम इंगळे,ऋषभ साळवे आदींनी विशेष प्रयत्न केले.

# रविकांत तुपकरांच्या अन्नत्याग आंदोलनाला पिंप्री आंधळे ग्रामपंचायतीचा जाहीर पाठिंबा

**जनसंचलन/ देऊळगाव राजा**



शेतकरी नेते रविकांत तुपकर यांच्या अन्नत्याग आंदोलनाला आता गावागावातून पाठिंब्याची लाट उसळू लागली आहे. महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमाफी मिळावी, हक्काचा पीकविमा मिळावा आणि शेतकऱ्यांच्या न्याय्य मागण्या तात्काळ मान्य कराव्यात, या मागण्यांसाठी बुलढाणा येथे तुपकर यांचे चार दिवसांपासून अन्नत्याग आंदोलन सुरू आहे. या आंदोलनाला देऊळगाव राजा तालुक्यातील पिंप्री आंधळे ग्रामपंचायतच्या वतीने जाहीर पाठिंबा देण्यात आला आहे. ग्रामपंचायत सरपंच सौ. अंजली अर्जुन आंधळे यांच्या वतीने पाठिंब्याचे पत्र रविकांत तुपकर यांना सुपूर्द करण्यात आले. शेतकऱ्यांच्या प्रश्नांसाठी गेली अनेक वर्षे रविकांत तुपकर सातत्याने रस्त्यावर उतरून लढा देत आहेत. शेतकरी हा देशाचा अन्नदाता असतानाही सरकारकडून त्याच्या प्रश्नांकडे सातत्याने दुर्लक्ष होत असल्याचा तीव्र आरोप ग्रामस्थांनी केला आहे. शेतीचा खर्च दिवसेंदिवस वाढत आहे, मात्र शेतमालाला योग्य हमीभाव मिळत नाही. पेरणीपासून कापणीपर्यंत शेतकऱ्यांना प्रचंड खर्च करावा लागतो; पण उत्पन्न मात्र अत्यल्प मिळते. त्यामुळे शेतकरी कर्जाच्या खाईत लोटला जात आहे. या आर्थिक तणावातून राज्यभरात शेतकरी आत्महत्यांचे चित्र गंभीर होत आहे. तरीही सरकार झोपेचे सोंग घेत असल्याने जनतेत तीव्र संताप निर्माण झाला आहे. रविकांत तुपकर यांची प्रकृती खालावत असतानाही सरकारने अद्याप ठोस दखल घेतलेली नाही. ही शेतकऱ्यांच्या वेदनांची थट्टा असल्याची भावना व्यक्त होत आहे. गुरुवारी बुलढाणा येथे पिंप्री आंधळे ग्रामपंचायतच्या जाहीर पाठिंब्याचे पत्र सोनू इंगळे, सचिन डोईफोडे, अक्षय परीहार, गोपाल डोईफोडे, योगेश आंधळे, कार्तिक वाघ, शिवानंद डोईफोडे, कारभारी आंधळे यांनी रविकांत तुपकर यांच्याकडे सुपूर्द केले.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ ९८२२७२०७८४ ऑफिस :- ९१२९५८२९५८